# देश विकासासाठी सहकार हाच पर्याय

## सुरेश प्रभू : 'सहकार : काल, आज आणि उद्या'वर व्याख्यान

**वसंत व्याख्यानमाला**

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ११ : देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या-पाचव्या क्रमांकावर पोहोचली असली, तरी दरडोई उत्पन्नाच्या (प्रतिव्यक्ती उत्पन्न) बाबतीत भारत अजूनही १२० व्या क्रमांकाच्या पुढे आहे. देश समृद्ध होत असला, तरी सर्वसामान्य व्यक्तीच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे देशाच्या विकासाबरोबरच व्यक्तीचाही सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सहकाराशिवाय दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन माजी केंद्रीयमंत्री सुरेश प्रभू यांनी केले.

शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिराच्या ५४ व्या वसंत व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी 'सहकार : काल, आज आणि उद्या' या विषयावर ते बोलत होते. व्यासपीठावर माजी मंत्री प्रकाश आवाडे, उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे, कार्यवाह मोहन पुजारी, सहकार्यवाह सुजित सौंदत्तीकर उपस्थित होते. ग्रंथालयासाठी निधी मंजूर करून दिल्याबद्दल वाचन मंदिरातर्फे आवाडे यांचा सत्कार केला. स्वागत व प्रास्ताविक, ओळख स्वानंद कुलकर्णी यांनी करून दिली.




इचलकरंजी : वसंत व्याख्यानमालेत समारोपादिवशी माजी केंद्रीयमंत्री सुरेश प्रभू यांचे व्याख्यान झाले. यावेळी व्यासपीठावर प्रकाश आवाडे, स्वानंद कुलकर्णी उपस्थित होते.

### कोल्हापूरचा विकास सहकारामुळेच

सहकाराला सर्वाधिक गती देण्याचे काम कोल्हापूर जिल्ह्यात झाले. सरकारपेक्षा सहकार चळवळीमुळेच जिल्ह्याचा विकास अधिक वेगाने झाला, असे गौरवोद्गार श्री. प्रभू यांनी काढले. राज्यात प्रगतिपथावर असलेल्या जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर अग्रस्थानी असून, सहकारातून विकास कसा घडू शकतो, याचे कोल्हापूर हे ज्वलंत उदाहरण असल्याचेही त्यांनी सांगितले.

### इचलकरंजीला रेल्वे देऊ शकलो नाही

रेल्वेमंत्री असताना इचलकरंजी रेल्वे मार्गासाठी काम सुरू केले होते. मात्र, आजही इचलकरंजी रेल्वेपासून वंचित राहिली, ही खंत माझ्या मनात कायम आहे, अशी भावना श्री. प्रभू यांनी व्यक्त केली. तसेच कोल्हापूर-वैभववाडी रेल्वे मार्गासाठी मंजुरी मिळवून तब्बल ५५० कोटींचा निधी मंजूर केला होता. मात्र, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अद्याप रेंगाळत असल्याची खंतही त्यांनी बोलून दाखवली.

Scanned with OKEN Scanner